॥श्री॥

PAGE No.
DATE

# जिवतीची पूजा

एका मातृशक्तीने दुसऱ्या रक्षक व पालक शक्तीचे केलेले पूजन म्हणजेच जिवती पूजन. जगातील सर्व प्राणिमात्रांच्या उज्वल भविष्याची रक्षणाची प्रार्थना म्हणजेच जिवती पूजन. जिवतीच्या प्रतिमेचे पुजन आणि त्याचा अर्थ काय हे जिवती? हिच्या पूजनाचा हेतू काय?

आषाढ महिन्याच्या अमावस्येला हे दीपपूजन केले जाते आणि याच दिवशी जरा-जिवतिका पूजन सुद्धा करतात. दिवा हे ज्ञानाचे प्रतिक आहे. अज्ञानाचा नाश करून ज्ञानाकडे जाणाऱ्या मार्गाचा मुख्य आधार आहे दीप. तुम्ही एक दिवा उजळा त्यावरून तुम्ही हजारो दिवे उजळू शकता. त्यामुळे त्याला वंशवृद्धीचे प्रतीक मानतात या प्रतिमेचे पूजन म्हणजे दीपपूजन.

दुसरी पूज्य देवता म्हणजे जिवती.


संपूर्ण श्रावण महिना या प्रतिमेचे पूजन केले जाते. संपूर्ण श्रावण महिना या प्रतिमेचे पूजन मातृशक्ती करून केल्या जातेव आपल्या अपत्यांच्या मंगलतेची प्रार्थना केली जाते.

जिवती प्रतिमेत प्रथम नरसिंह, नंतर कालिया-मर्दन करणारा कृष्ण मध्यभागी मुलांना खेळवणाऱ्या जरा-जिवतिका आणि खाल्यात खाली बुध बृहस्पती (गुरु) यांचा समावेश असतो. याच क्रमाने त्यांना पुजले जाते.

जरा व जिवतिका यक्ष गणातील देवता आहेत. जरा याविषयी बद्दल महाभारतात कथा आहे. जरेचीच सखी जिवती. जिवतिका या शब्दाचा अपभ्रंश होतो जिवती. जिवतीचा अर्थ होतो दीर्घायू प्रदान करणारी. बाळकांच्या दीर्घायुष्याची कामना करून या देवीची पूजा करतात. ही देवी पाळण्यात व आजूबाजूनी बाळकांना खेळवते अस्या रुपात आहे.

श्रावण महिना संपला कि या प्रतिमेचे विसर्जन करतात. श्रावण अमावस्येला हा कागद उघडा करून ठेवायची व दुसऱ्या दिवशी ह्या कागदाचे विसर्जन करण्याची प्रथा आहे.

नमस्कार.



**व्हिडिओ पहा**

सौ. अनघा आपटे
Phone. 9146398897